# वाघिरे महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन





**जुन्नर** : २४ जानेवारी रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील भूगोल विभाग आयोजित कला शाखेचा माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.अशा प्रकारची माहिती भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.आमश्या पाडवी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट यांनी दिली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ.पाडवी यांनी केले.त्यांनी आपल्या मनोगतामध्ये,महाविद्यालयाच्या स्थापने पासून ते सद्यस्थितीपर्यंतचा आढावा घेऊन,भूगोल विभागातील माजी विभागप्रमुख व त्यांचे सहकारी यांनी विभागात केलेल्या विकासात्मक प्रगतीचा मागोवा घेतला.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनातून स्वतःला वेळ देऊन पर्यटन करा, वाढदिवसाला वृक्षारोपण करा, गरिबाला मदत करा, मुलांना चांगले शिक्षण द्यावे व महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी योगदान द्यावे असे आवाहन केले.डॉ.कल्याण सोनावणे यांनी ''मेळावा आयोजित करण्यामागील हेतू म्हणजे सर्व माजी विद्यार्थ्यांचा एकत्रित स्नेह मिळावा व्हावा, सर्वांची भेट व्हावी,महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा मिळावा,जुने दिवस परत आठविण्यासाठी,जुन्या मित्रांची भेट होण्यासाठी, आपल्या गुरूंचे पुन्हा दर्शन व्हावे,व महाविद्यालयातील होणारी जडणघडण जाणून घेण हा होता असे सांगितले.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी राहुल हांडे (पोलीस पाटील, उंब्रज) व डॉ. सुधीर तांबे (प्राध्यापक, बी.जे. कॉलेज आळे), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट तसेच उपप्राचार्य डॉ.कल्याण सोनवणे व कला शाखेचे सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, तर माजी विद्यार्थ्याकडून देखील कला शाखेतील सर्व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख पाहुणे राहुल हांडे यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला,शिक्षकांबद्दलचे प्रेम, महाविद्यालयातील शिस्त,गंमती जंमती,शिक्षकांची ज्ञानाची शिदोरी,किती टेन्शन आलं तरी चेहरा सतत हसरा ठेवण्यातच खरं जीवनाचे सूत्र असल्याचे त्यांनी सांगितले.डॉ.सुधीर तांबे,गणेश गायकर,आशिष ठोंबरे,शांताराम बांगर, दिलीप शिंगोटे,दत्तात्रय बनकर,अशोक डोंगरे,सुदर्शन कांबळे,कु. अक्षया डोंगरे,अविनाश हांडे,खळदकर,बापू देशमुख व राहुल हुलावळे यांनी आपल्या मनोगताच्या माध्यमातून महाविद्यालयातील आठवणींना उजाळा देण्याचे काम केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य शिरसाट यांनी, मी स्वतः महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याचे सांगितले, समाजात वावरणारे आपले माजी विद्यार्थी मित्र हे महाविद्यालयाचे भूषण असून, माजी विद्यार्थी जेवढे मोठे होत आहेत, हीच खरी महाविद्यालयाची संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये कला शाखेचे प्राध्यापक डॉ.वसंत गावडे, डॉसंदिपान गव्हाळे,डॉ. रमेश काशिदे,डॉ.राजेंद्र आंबवणे,डॉ. रोहिणी मदने,डॉ. जनार्दन नाडेकर,डॉ.नंदकिशोर उगले,डॉ.जितेंद्र घोडके,डॉ. अंकुश मोधे,डॉ.उमेशराज पनेरु,डॉ.निलेश हांडे व डॉ.योगेश्वर काळदंते यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निलेश काळे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.रमेश गोपाळे यांनी केले.

# बिलोलीत रोजगर हमी योजनेत महाघोटाळा, रोजगार सेवकासह अधिकाऱ्यांची गुत्तेदारी

## योजना मंजूर करण्यासाठी मोजावे लागतात पाच हजार

**नांदेडः** जिल्हा बिलोली पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या रोजगार हमी योजना विभागात महाघोटाळा, कंत्राटी बेसिक असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची मनमानी बहुतांश रोजगार सेवकांना हाताशी धरून रोहयोच्या कामात मोठ्या प्रमाणात गुत्तेदारी चालू आहे. यामुळे इतर लाभार्थ्यांना या योजनाचा लाभ घेण्यासाठी एका फाईलला मोजावे लागतात पाच हजार रुपये. रक्कम न दिल्यास नियमाचा बडगा दाखवून वर्षभर वंचित ठेवल्या जात आहे, याबाबत या विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी होत आहे. महाराष्ट्र शासनाने सन १९७२ मध्ये १५ कलमी कार्यक्रम' तयार केला होता. त्यामध्ये रोजगार हमी योजनेवाही समावेश होता.






अंगमेहनतीचे काम करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला काम मिळवून देऊन स्वाभीमानाने जीवन जगण्यासारखी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. ही राज्य शासनाची रोजगार हमी योजना सुरु करण्यामागील भूमिका आहे.

महाराष्ट्रातील शेतमजूरांना शेतीच्या हंगामात वर्षभरात सरासरीचे चार ते साडेचार महिने काम मिळते. शेतीचा हंगाम नसतो त्या कामाअभावी त्यांची श्रमशक्ती वाया जात असते आणि काम नसते म्हणून त्यांना उपाशीपोटी रहावे लागते. वाया जाणाऱ्या श्रमशक्तीचा उपयोग करुन उत्पादक स्वरुपाच्या विकासाच्या अनेक योजना पूर्ण करणे व स्वाधबरोबर शेतमजुरांना काम देऊन त्यांची उपासमार रोखणे अशा दुहेरी हेतूने राज्य शासनाने रोजगार हमी या योजनेचा अंगिकार केला आहे.याबरोबर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्यात या (मनरेगा/रोहयो) अंतर्गत शेतकऱ्यांसाठी प्रामुख्याने फळबाग लागवड, शेततळे, सिंचन विहीर, शेत रस्ते आणि जनावरांच्या शेड बांधकामासारख्या योजना राबवल्या जातात, ज्यात १००% अनुदानासह मजुरीचाही लाभ मिळतो या अंतर्गत जॉबकार्डधारक शेतकरी हे फळबाग आणि इतर वैयक्तिक सिंचन सुविधांसाठी पात्र ठरविण्यात येतो. पण बिलोली तालुक्यात रोहयो योजनेत विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची मोठी मनमानी चालत असून मागेल त्याला योजनेचा लाभ देण्या ऐवजी जो पाच हजार देईल त्यालाच योजनेचा लाभ दिला जातो, आणि आपल्या रोजगार सेवाका मार्फत मागेल तेवढी कामे देऊन गुत्तेदारी करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. व हे काम मजुराकडून करण्या ऐवजी जेसीबी मशीन यंत्रच्या सह्याने करण्यात येते. याबाबत संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांची चौशी करून योग्यती कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

# ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त''राष्ट्र प्रथम''उपक्रम अंतर्गत इंडियन आर्मी नाव साकारून देशाला मानवंदना ऊजा

**जामखेडः** नागेश विद्यालयातील माजी विद्यार्थी मेळावा होणार संपन्न.. एक अफलातून कल्पना. आगळा वेगळा उपक्रम.. जगातील सर्वात मोठे मानवी रचनेतील '' INdIAN ARMY '' नाव रयत शिक्षण संस्थेचे श्री नागेश विद्यालय जामखेड येथे साकार आहे.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये अर्ज दाखल ( Guinness WoA°ld RecoA°ds Application RefeA°ence: 260119135349twlc )

७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त '' राष्ट्र प्रथम '' उपक्रम अंतर्गत खछूखअछ अठचध (इंडियन आर्मी) नाव साकारून देशाला मानवंदना. रयत शिक्षण संस्थचे श्री नागेश विद्यालय जामखेड व ज्युनिअर कॉलेज व



कन्या विद्यालय जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न होणार आहे. '' राष्ट्र प्रथम '' उपक्रम अंतर्गत जगातील सर्वात मोठे नाव'' ''INdIAN ARMY '' मानवी रचनेत विद्यार्थी बैठक रचनेत साकार होणार असून देशभक्ती गीतावर कवायत, संचलन सादर होणार आहे. या मध्ये श्री नागेश विद्यालय,ज्युनिअर कॉलेज ,कन्या विद्यालय व १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे कॅडेट, सर्व शिक्षक आजी-माजी सैनिक,पालक,ग्रामस्थ सहभागी होणार आहेत.

प्रजासत्ताक दिनानिमित्त भव्य मानवी रचनेतील ''INdIAN ARMY (इंडियन आर्मी) '' हे नाव साकारण्यात येणार आहे. या मानवी चित्राची लांबी १६०व रुंदी १६५ फूट असून क्षेत्रफळ २६४०० स्क्वेअर फुट आहे . या मानवी रचनेतील चित्रात भव्य १७५ फूट तिरंगा विद्यार्थ्यांनी हातात धरून फडकवनार आहे. कलाशिक्षक तथा एनसीसी ऑफिसर मयूर कृष्णाजी भोसले यांनी हे साकारणार आहेत. श्री नागेश व कन्या विद्यालय मधील २६०० विद्यार्थी विद्यार्थिनी देशभक्ती गीतावर कवायत सादर करणार आहेत. १७ महा बटालियन एनसीसीचे नागेश विद्यालय युनिटचे एनसीसी कॅडेट उत्कृष्ट संचलन सादर करून मानवंदना देणार आहेत.

सोमवार २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० वा ध्वजारोहण होणार आहे. तसेच २६ जानेवारी ११.०० वाजता रयत शिक्षण संस्थेच्या नागेश विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न होणार आहे.या राष्ट्रीय कार्यक्रम प्रजासत्ताक दिनानिमित्त व देशभक्ती उपक्रम पाहण्यासाठी व माजी विद्यार्थी मेळाव्या साठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य मडके बी के यांनी केले.

# वासुंदे येथे संत भाऊसाहेब महाराजांच्या पुण्यस्मरणार्थ भव्य शताब्दी सोहळा

## २७ जानेवारी ते ५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान श्रीमद् भागवत कथा, अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण

**पारनेर :** तालुक्यातील वासुंदे येथे श्री संत भाऊसाहेब महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ 'श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ', 'अखंड हरिनाम सप्ताह शताब्दी सोहळा' व 'ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण' यांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा २७ जानेवारी ते ५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार असून, संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघणार आहे.सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ह.भ.प. विकासानंदजी महाराज मिसाळ (संस्थापक - श्रीमद् आद्य जगद्गुरु शंकराचार्य विद्यात्मक श्री वारकरी पीठ, पिंपळगाव वाघा) यांची 'श्रीमद् भागवत कथा'. दररोज सायंकाळी ६ ते ९ वाजता ही कथा होईल. मंगळवार, २७ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता 'श्रीमद् भागवत


|| श्री संत भाऊसाहेब महाराज प्रस

ग्रंथ' ची भव्य मिरवणूक काढून कथेचा प्रारंभ होईल. सप्ताहात दररोज पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४:३० ते ५ हरिपाठ आणि सायंकाळी ३ ते ६ कीर्तनाचे कार्यक्रम होतील. कीर्तन सेवेसाठी प्रसिद्ध कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार आहे, ज्यात ह.भ.प. मल्हार महाराज हिंगडे, गोरक्ष महाराज रोकडे, रमेश महाराज कुलकर्णी, सुमित महाराज झावरे, किरण महाराज कुलकर्णी, अरुण महाराज उंबरेकर, राजेश्वरानंद महाराज कुन्हे, शामसुंदर महाराज नानेकर व शुभम महाराज तांबे यांचा समावेश आहे.बुधवार, ४ फेब्रुवारी रोजी 'भव्य दिंडी सोहळा' व 'दीपोत्सव' तर शुक्रवार, ६ फेब्रुवारी रोजी कुस्त्यांचा भव्य हगामा आयोजित आहे. गुरुवार, ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता ह भ प विकासानंदजी मिसाळ महाराजांचे 'काल्याचे कीर्तन' होईल. दररोज विविध कुटुंबांकडून नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवणाची व्यवस्था अन्नदात्यांच्या परंपरेनुसार होईल.वासुंदे ग्रामस्थांसह मुंबई, पुणे, संभाजीनगर येथील भाविकांनी विशेष सहकार्य केले आहे. सप्ताह समितीच्या वतीने पारनेर तालुका व परिसरातील सर्व भाविकांनी या शताब्दी सोहळ्याचा व ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या माहिती सप्ताह प्रमुख व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केली आहे.

# कर वसुलीत भ्रष्टाचार केल्याप्रकरणी ग्रामसेवका विरोधात आमरण उपोषणाचा इशारा

नांदेड : जिल्हा बिलोली तालुक्यातील मौजे कोल्हेबोरगाव ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवक के.एम. हाम्पले यांचा मनमानी कारभार , ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता व घरकुलधारक यांच्याकडून आव्वाच्या सव्वा कर वसूल करून ग्रामपंचायतच्या जनरल खात्यावर जमा न करता अंदाजे २ ते ३ लाख रुपये परस्पर हडप केले या प्रकरणी त्यांच्या विरुद्ध दि. २६ जानेवारी रोजी पंचायत समिती कार्यालय बिलोली येथे आमरण उपोषण करणार असल्याचा निवेदना द्वारे इशारा अरविंद कांबळे यांनी दिला आहे. कोल्हेबोरगाव येथील तत्कालीन वादग्रस्त ग्रामसेवक के. एम. हाम्पले यांनी या अगोदर कंधार येथे कार्यरत असतांना ग्रामपंचायच्या कारभारात भ्रष्टाचार केला होता. त्याबातचे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असतांना देखील बिलोली तालुक्यातील कोल्हेबोरगाव ग्रामपंचायतीमध्ये देखील आपल्या मनमानी कारभार करून मालमत्ता धारक व




घरकुलधारक यांच्याकडून आव्वाच्या सव्वा रक्कम वसूल करून सदरील जनरल खात्यावर तसेच बँकेत न भरता अंदाजे दोन ते तीन लाख रुपये परस्पर हडप केले. याबाबत ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी अरविंद कांबळे यांनी अनेक वेळा विचारणा केली असता त्यांनी तुम्हाला काय करायचे ते करा माझी तयारी आहे. असे मुजोरपणाच्या भाषेत उत्तर दिले. म्हणून कांबळे जण माहीती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहितीचा अधिकार दिला परंतु सदरील माहिती सध्याचे ग्रामपंचायत अधिकारी राजेश बेंद्रीकर यांनी देण्यास नकार दिले याबाबत विचारणा केल्या

**तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी के. एम. हाम्पले यांनी सन २०१६- १७ मध्ये कंधार तालुक्यातील दहीकंळबा येथे देखील पैशाचा गैरव्यवहार केल्या प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्ताकडे असतांना देखील अजून एक नविन प्रताप केला आहे. २५० घरकूल प्रस्तावापैकी १०० प्रस्ताव गायब केले. व करपट्टीची रक्कम परस्पर वसुल करून हडप. आणि जन्म-मृत्यू प्रमाणपत्राची ग्रा. पं. ला नोंद नसतांनाही मनासारखी रक्कम घेऊन प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच घराचा वारसा फेर, संमती फेरला ५ हजार रुपये घेऊन गावातून पलायन झाले.**

असता मला चार्जमध्ये सगळे रेकॉर्ड दिले नाहीत त्यामुळे मी तुम्हाला माहिती देऊ शकत नाही.म्हणून तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी के. एम. हाम्पले यांची चौकशी करून तात्काळ कार्यवाही करून निलंबित करावे या मागणीसाठी कांबळे यांनी येत्या प्रजासत्ताक दिनी आमरण उपोषण करण्याचा निवेदनाद्वारे इशारा गट विकास अधिकारी यांना दिला आहे.

# शिवरायांच्या स्वराज्याची बीजे तुकोबारायांच्या विचारांतूनच

## मावळे म्हणजेच तुकोबारायांचे खरे वारकरी

## देहूतून सामाजिक जागृतीची सुरुवात-खासदार नीलेश लंके



### देहूतूनच मोहिमेची सुरुवात

**संत तुकाराम महाराजांनी समाजनिर्मितीसाठी दिलेले योगदान अमूल्य आहे. देहूत आल्यानंतर जगण्याची आणि जगवण्याची नवी ऊर्जा मिळते. म्हणूनच या सामाजिक मोहिमेची सुरुवात पुण्यनगरीतील देहूनगरीतून आज शनिवार (ता. २४) पासून करण्यात आली, असेही यावेळी सांगण्यात आले.**

**अहिल्यानगर :** देहूनगरी ही केवळ भक्तीचीच नव्हे, तर शक्ती आणि राष्ट्रनिर्मितीचीही पवित्र भूमी आहे. याच भूमीत संत तुकाराम महाराजांच्या विचारांतून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना साकार केली. शिवाजी महाराजांचे मावळे हे तलवारीचे शिलेदार होण्याआधी तुकोबारायांचे निष्ठावंत वारकरी होते. आधी वारकरी म्हणून घडलेले हे मावळे पुढे स्वराज्याचे कर्ते झाले, असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले.

आपला मावळ सामाजिक संघटनेच्या वतीने देहू येथे राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता व वृक्षारोपण मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी खासदार लंके बोलत होते. देहूतील प्रमुख रस्ते, नदीकाठ आणि सार्वजनिक ठिकाणी व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. संत तुकाराम महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरूवर्य होते. त्यांच्या विचारांतून शिवरायांना आदर्श राज्यकारभाराची दिशा मिळाली. मावळ खोऱ्यातून सुरू झालेली ही चळवळ पुढे संपूर्ण स्वराज्याचा कणा ठरली, असेही लंके यांनी नमूद केले.

या वेळी उपस्थित पत्रकारांनी राजकीय परिस्थितीबाबत विचारणा केली असता, ही मोहीम पूर्णतः सामाजिक असून त्यात कोणतेही राजकीय भाष्य केले जाणार नाही, असे स्पष्ट करत खासदार लंके यांनी राजकीय प्रश्नांवर बोलणे टाळले.

मोहिमेअंतर्गत देहू देवस्थान संस्थानला खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते दोन बाकडे, दोन कचरा पेट्या तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती करणारे फलक प्रदान करण्यात आले. याशिवाय गावातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्वच्छता साहित्याचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास देहू देवस्थानचे विश्वस्त ह.भ.प. लक्ष्मण महाराज मोरे, गणेश महाराज मोरे, वैभव महाराज मोरे, उमेश महाराज मोरे, दिलीप महाराज मोरे, कीर्तनकार कुंडलिक महाराज मोरे, आपलं मावळ प्रतिष्ठान देहूनगरीचे अध्यक्ष प्रदीप काळोखे, देहूच्या माजी सरपंच रत्नमाला करंडे, सुनीता परंडवाल, संदीप शिंदे, उद्योजक गणेश शेठ काळोखे, राजेश वळसे पाटील, रमाकांत जी मोरे, बबनराव गुंजाळ, बाबासाहेब गायके चक्रधर राजदेव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपला मावळ सामाजिक संघटनेच्या वतीने राज्यभर गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता, वृक्षारोपण तसेच सौरऊर्जेवर आधारित दिवे बसविणे असे विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. या उपक्रमांचा मुख्य उद्देश तरुण पिढीत छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकाराम महाराज यांचे विचार रुजविणे हा आहे. शिवाजी महाराजांनी राज्यकारभारातून आदर्श मावळे घडविले. असेच मावळे पुन्हा उभे राहून मातृभूमीच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहावेत, असे आवाहन संघटनेचे राज्य सचिव प्रा. सीताराम काकडे यांनी केले.